# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 12 February 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १२ फेब्रुवारी २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- केंद्र शासनात नव्याने भरती एक लाखावर उमेदवारांना पंतप्रधानांच्या हस्ते नियुक्तीपत्रं प्रदान
- शासकीय वैद्यकीय रुग्णालय आणि महाविद्यालयांसाठी चार हजार कोटी रूपये निधी मंजूर
- माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा आमदारकी तसंच काँग्रेस पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा
- समृध्दी महामार्गावर जालना हद्दीत रुग्णवाहिकेचा अपघात; दोन जणांचा मृत्यू

आणि

- नांदेड शहरात विकसित भारत संकल्प यात्रेच्या दुसऱ्या टप्प्याचा आज समारोप

****

रोजगार मेळाव्यातली भरती प्रक्रिया पारदर्शक केली असून, त्यामुळे रोजगार निर्मितीमध्ये वाढ होईल असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. रोजगार मेळाव्याअंतर्गत केंद्र सरकारच्या विविध आस्थापनांमध्ये नव्याने भरती झालेल्या एक लाखाहून अधिक उमेदवारांना पंतप्रधानांच्या हस्ते दूरदृश्य संवाद यंत्रणेच्या माध्यमातून नियुक्तीपत्रं प्रदान वाटप करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. प्रत्येकाला त्यांची क्षमता दाखवण्याची समान संधी मिळावी यासाठी नियुक्ती प्रक्रिया निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, देशात युवकांना रोजगार देण्याची प्रक्रिया वेगानं सुरु असल्याचं पंतप्रधान म्हणाले. देशभरात ४७ ठिकाणी हा मेळावा घेण्यात आला. तत्पूर्वी, पंतप्रधानांनी नवी दिल्लीतल्या कर्मयोगी भवनाची पायाभरणी केली.

नागपूर इथं हिंगण्याच्या केंद्रीय राखीव पोलीस बल – सीआरपीएफ ग्रुप सेंटर इथं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत रोजगार मेळावा घेण्यात आला. जात, धर्म, पंथ, लिंग यापलीकडे जाऊन गोरगरीब, कष्टकरी, सामान्य जनता या समाज घटकांना सेवा देण्याचं काम शासकीय कर्मचाऱ्यांवर असतं, असंच सेवा कार्य नवनियुक्तांकडून घडावं, अशी अपेक्षा गडकरी यांनी यावेळी व्यक्त केली. या कार्यक्रमात ११९ जणांना नियुक्ती पत्रं प्रदान करण्यात आली.

****

धुळे इथं शासन आपल्या दारी कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते मानधनासाठी निवड झालेल्या कलावंतांना पात्र लाभार्थी निवडपत्र देण्यात आलं. जिल्ह्यातल्या ४०० वृद्ध वारकरी कलावंतांना मानधन सुरु करण्यात आलं.

****

राज्यातल्या शासकीय वैद्यकीय रुग्णालय आणि महाविद्यालयांमध्ये अद्ययावत सुधारणा करण्यासाठी आशियाई विकास बँकेनं चार हजार कोटी रूपये मंजूर केले असून पहिल्या टप्प्यात बाराशे कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत यासंदर्भात झालेल्या बैठकीत ही माहिती दिली. राज्यातल्या आकांक्षित जिल्ह्यांमध्ये अद्ययावत आणि दर्जेदार जिल्हा रुग्णालयं उभारण्यासाठी हा निधी खर्च करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. धाराशिव जिल्ह्यात पाचशे खाटांचं अद्ययावत जिल्हा रुग्णालय उभारण्याची कार्यवाही तत्काळ सुरू करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

****

राज्यातल्या ४० दुष्काळी तालुक्यातील शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून सोळाशे कोटी रुपयांची मदत दिली जाणार असल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. राज्यातल्या ३२ लाख शेतकऱ्यांना याचा लाभ होईल. या तालुक्यांमधील बाधित क्षेत्राचे अहवाल तातडीनं शासनाला सादर करावेत, असे निर्देश प्रशासकीय यंत्रणेला देण्यात आले आहेत.

****

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी आज आपल्या आमदारकीचा तसंच काँग्रेस पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला. याबाबतचं पत्र त्यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना पाठवलं आहे. राजीनामा देणं हा वैयक्तिक निर्णय असल्याचं चव्हाण यावेळी म्हणाले. काही अन्य पर्याय पहावेत असं वाटल्यानं आपण राजीनामा दिला, असा खुलासा चव्हाण यांनी केला. येत्या दोन दिवसात आपण आपली पुढची राजकीय भूमिका जाहीर करू, असं चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.

***अशोक चव्हाणांना पक्षाने खूप दिलंय हे निश्चितच बरोबर आहे, पण अशोक चव्हाणांनी सुद्धा पक्षाकरीता खूप केलं ह्या दोन्ही गोष्टी बरोबरीने आहेत. त्यामुळे अशोक चव्हाण हे जिथे राहिले तिथे प्रामाणिकपणे राहिले हे मला मुद्दाम सांगावसं वाटतंय. पक्षाने मला मोठं केलं, तर मी सुद्धा पक्षासाठी काही कधी कमी केलं नाही असं मी मुद्दाम सांगतो. कोण काय करेल हे मला माहित नाही. पण ही माझी भूमिका आहे की कोणत्याही आमदाराला संपर्क केला नाही.***

****

जात प्रमाणपत्र पडताळणी अधिसूचनेच्या मसुद्याबाबत हरकत नोंदवण्यासाठी मुदतवाढ द्या अशी मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांना पत्राद्वारे केली आहे. मराठा समाजाचा ओबीसींमध्ये सरसकट समावेश करण्यासाठी सगेसोयरे या शब्दाच्या व्याख्येबाबत शासनाने मसुदा तयार केला आहे. या मसुद्यावर हरकत नोंदवण्यासाठी १६ फेब्रुवारी पर्यंत मुदत देण्यात आली आहे. यात अजून १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी असं भुजबळ यांनी पत्रात म्हटलं आहे.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे आज छत्रपती संभाजीनगर इथं जनसंवाद दौऱ्यावर आले आहेत. याअंतर्गत ते गंगापूर, वैजापूर, कन्नड पाठोपाठ संध्याकाळी साडे सात वाजेच्या सुमारास छत्रपती संभाजीनगर इथं जनतेशी संवाद साधणार आहेत.

****

नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गावरील जालना हद्दीतल्या जामवाडी शिवारात आज पहाटे एका रुग्णवाहिकेचा अपघात झाला. या अपघातात दोनजण ठार, तर अन्य दोघेजण गंभीर जखमी झाले. रुग्णवाहिका मुंबईतल्या सायन रुग्णालयातून एक मृतदेह घेऊन उत्तर प्रदेशकडे जात असताना ही दुर्घटना घडल्याची माहिती महामार्ग पोलिसांनी दिली. सर्वजण उत्तर प्रदेशातले रहिवासी असून, जखमींवर जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. समृद्धी महामार्गावर आठवडाभरातला हा तिसरा अपघात आहे.

****

नांदेड शहरात आज विकसित भारत संकल्प यात्रेच्या दुसऱ्या टप्प्याचा शहरातील नंदिग्राम सोसायटी इथं समारोप झाला. यावेळी भारतीय जनता पक्षाचे प्रवीण साले, महादेवी मठपती यांच्यासह क्षेत्रिय अधिकारी फरहतउल्ला बेग, कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, सहाय्यक नोडल अधिकारी प्रकाश कांबळे, अशोक सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नागरिकांनी आयुष्यमान कार्ड तसंच पंतप्रधान स्वनिधी योजनेचा लाभ घेतला, तसंच आरोग्य तपासणी शिबिरातही सहभाग नोंदवला. यावेळी मेरी कहानी मेरी जुबानी अंतर्गत विविध योजनांचे लाभ मिळालेल्या वंदना पंडित, सोनाली सोनकांबळे या लाभार्थींनी आपलं मनोगत व्यक्त केलं.

**बाईट – वंदना पंडीत, सोनाली सोनकांबळे जि.नांदेड**

****

लातूर इथं राज्य पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्यावतीनं महासंस्कृती महोत्सव, तसंच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या विभागीय शंभराव्या नाट्यसंमेलनाला आजपासून सुरूवात झाली. यावेळी गंजगोलाई परिसरात काढण्यात आलेल्या नाट्यदिंडीत पारंपारिक वेशभूषेतील लोककलावंतांनी ढोल-ताशांच्या गजरात विविध कलांचं सादरीकरण केलं. आमदार संभाजी पाटील निलंगेकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे, ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी, यांच्यासह विविध कलाकार, अधिकारी या नाट्यदिंडीला उपस्थिती होते. हे संमेलन १५ तारखेपर्यंत चालणार आहे.

****

नांदेड इथं १५ ते १९ फेब्रुवारी दरम्यान भव्य सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली. विविध क्रिडा स्पर्धांसह, लोककला, लोक संगीत, लोकनृत्यांचं सादरीकरण यावेळी करण्यात येणार आहे. वस्त्र, हस्तकला वस्तू, आणि बचत बचतगटांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचं प्रदर्शन यावेळी भरवण्यात येणार आहे. या कार्यक्रमात नागरिकांनी उत्स्फुर्तपणे सहभागी व्हावं असं आवाहन जिल्हाधिकारी राऊत यांनी केलं आहे.

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीनं दरवर्षी दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार यंदा प्रसिद्ध लेखक रा.रं.बोराडे यांना जाहीर झाला आहे. उद्या सकाळी बोराडे यांच्या छत्रपती संभाजीनगर इथल्या निवासस्थानी परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांच्या हस्ते पुरस्कार देऊन त्यांना सन्मानिक करण्यात येणार आहे. मानपत्र, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि पंचवीस हजार रूपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

****

जिल्हा सैनिक कल्याण विभागातील गट क मधील पदभरतीसाठी माजी सैनिकांकडून अर्ज मागवण्यात येत आहेत. यासाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी आजपासून ३ मार्च पर्यंत विभागाच्या संकेतस्थळावर पात्र उमेदवारांना ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. याबाबत अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला भेट द्यावी असं आवाहन विभागातर्फे करण्यात आलं आहे.

****

गडचिरोली इथं जिल्हाधिकाऱ्यांच्या निवासस्थानातील सुरक्षा रक्षकानं आज गोळी झाडून आत्महत्या केली. उत्तम श्रीरामे असं आत्महत्या केलेल्या जवानाचं नाव असून, ते नांदेड जिल्ह्यातल्या देगलूर तालुक्यातील रहिवासी होते.

****